**जोहान्सबर्ग येथे G20 शिखर परिषदेत पंतप्रधानांचा सहभाग**

22 नोव्हेंबर 2025

दक्षिण आफ्रिकेच्या राष्ट्रपती, महामहिम श्री. सिरिल रामाफोसा यांनी जोहान्सबर्गमध्ये आयोजित केलेल्या G20 नेत्यांच्या शिखर परिषदेत आज पंतप्रधान सहभागी झाले. G20 शिखर परिषदेत हा पंतप्रधानांचा 12वा सहभाग होता. पंतप्रधानांनी शिखर परिषदेच्या उद्घाटन दिनाच्या दोन्ही सत्रांना संबोधित केले. त्यांनी राष्ट्रपती रामाफोसा यांचे आपुलकीने केलेल्या आदरातिथ्याबद्दल आणि शिखर परिषदेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल आभार मानले.

2. "सर्वांच्या सोबतीने सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक विकास" वरील उद्घाटन सत्राला संबोधित करताना, कौशल्यपूर्ण स्थलांतर, पर्यटन, अन्न सुरक्षा, AI, डिजिटल अर्थव्यवस्था, नवोपक्रम आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रात दक्षिण आफ्रिकेच्या अध्यक्षतेखालील गटाने केलेल्या कामाची पंतप्रधानांनी प्रशंसा केली. या प्रक्रियेत त्यांनी नमूद केले की, नवी दिल्ली शिखर परिषदेदरम्यान घेतलेले काही ऐतिहासिक निर्णय पुढे नेण्यात आले आहेत. G20 शिखर परिषद आफ्रिकेत प्रथमच आयोजित होत असताना विकासातील असंतुलन आणि नैसर्गिक साधनांचा अतिवापर, यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या, विकासाच्या नव्या निकषांवर विचार करण्याची वेळ आली आहे, यावर पंतप्रधानांनी भर दिला. या संदर्भात त्यांनी सांगितले की, भारताच्या सांस्कृतिक परंपरेवर आधारित "समग्र मानवतावाद" या संकल्पनेवर अधिक विचार झाला पाहिजे. पुढे ते म्हणाले की समग्र मानवतावाद हा माणूस, समाज आणि निसर्ग याकडे समग्र दृष्टीने पाहतो आणि अशा प्रकारे प्रगती व निसर्ग यामधील समतोल साधता येतो.

3. सर्वांसाठी वाढ, विकास आणि कल्याण याबाबत भारताची भूमिका विशद करताना पंतप्रधानांनी G20 साठी सहा कल्पनांचा प्रस्ताव दिला. त्यामध्ये अंतर्भाव असेल:

* G20 जागतिक पारंपरिक ज्ञान भांडाराची निर्मिती: यामुळे मानवतेचे सामूहिक शहाणपण भावी पिढ्यांच्या फायद्यासाठी उपयोगाला येईल.

* G20 आफ्रिका कौशल्य बहुवर्धक निर्मिती: या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आफ्रिकेतील युवकांचे कौशल्यवर्धन करण्यासाठी एक दशलक्ष प्रमाणित प्रशिक्षकांची एक मोठी फळी तयार करणे आहे. यामुळे स्थानिक क्षमता उभारणी होईल आणि खंडात दीर्घकालीन विकासाला चालना मिळेल

* G20 जागतिक आरोग्य प्रतिसाद पथकाची निर्मिती: यामध्ये G20 देशांतील प्रत्येक आरोग्यसेवा तज्ज्ञांचा समावेश असेल आणि त्यांना जगातील कोणत्याही भागात जागतिक आरोग्य आव्हानांचा सामना करण्यासाठी तैनात केले जाऊ शकते.

* G20 ओपन सॅटेलाईट डाटा भागीदारीची स्थापना: या कार्यक्रमाद्वारे G-20 अंतराळ एजन्सीचा सॅटेलाईट डाटा कृषी, मत्स्यपालन, आपत्ती व्यवस्थापन यासह इतर उपक्रमांसाठी विकसनशील देशांना उपलब्ध करून दिला जाईल.

* G20 महत्त्वपूर्ण खनिज परिपत्रक उपक्रमाची निर्मिती: हा उपक्रम पुनर्वापर, शहरी खाणकाम, पुनर्नियोजित वापरातील बॅटरी प्रकल्प आणि विविध प्रकारच्या नवोपक्रमांना प्रोत्साहन देईल आणि पुरवठा साखळी सुरक्षा मजबूत करण्यास आणि विकासाचे स्वच्छ मार्ग विकसित करण्यास मदत करेल.

* अंमली पदार्थ-दहशतवाद जाळ्यांचा सामना करण्यासाठी G20 उपक्रम निर्मिती: या उपक्रमाद्वारे अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यास मदत होईल आणि अंमली पदार्थ-संबंधित दहशत अर्थतंत्राला आळा बसेल.

4. पंतप्रधानांनी "एक लवचिक जग - आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी G20 योगदान; हवामान बदल; न्याय्य ऊर्जा संक्रमण; अन्न प्रणाली" या सत्राला देखील संबोधित केले. भारताने सुरू केलेल्या आपत्ती जोखीम कमी करण्याच्या कार्यगटाला पुढे नेले जात असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. त्यांनी असे नमूद केले आपत्ती लवचिकतेचा दृष्टीकोन भारताने स्थापित केलेल्या आपत्ती लवचिक पायाभूत सुविधांसाठीच्या युतीमध्ये "प्रतिसाद-केंद्रित" ऐवजी "विकास-केंद्रित" असावा. अन्न सुरक्षा बळकट करण्यासाठी हवामानविषयक कार्यक्रमावर अधिक सामूहिक कृती करण्याचे आवाहन पंतप्रधानांनी केले. या संदर्भात, त्यांनी पौष्टिकतेसाठी आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी भरड धान्यांचे महत्त्व अधोरेखित केले. भारताच्या अध्यक्षतेदरम्यान स्वीकृत अन्न सुरक्षेवरील डेक्कन तत्त्वांचा उल्लेख करून त्यांनी सांगितले की, असा दृष्टिकोन G20 अन्न सुरक्षा रोडमॅप तयार करण्याचा पाया असावा. त्यांनी विकसित देशांना कालबद्ध पद्धतीने विकसनशील देशांना परवडणारे वित्त आणि तंत्रज्ञान प्रदान करण्याच्या त्यांच्या हवामान कृती वचनबद्धतेची पूर्तता करण्याचे आवाहन केले.

5. पंतप्रधानांनी जागतिक नियामक संरचनांमध्ये ग्लोबल साउथच्या अधिकाधिक भागीदारीची मागणी केली. या संदर्भात, त्यांनी नमूद केले की नवी दिल्ली शिखर परिषदेत अफ्रिकन युनियनला G20 चा स्थायी सदस्य म्हणून समाविष्ट करणे, हे एक मोठे पाऊल होते आणि ही समावेशकता G20 पलीकडेही पोहोचली पाहिजे. पंतप्रधानांचे दोन्ही सत्रातील संपूर्ण भाषण तुम्ही येथे पाहू शकता [सत्र 1; सत्र 2]

जोहान्सबर्ग

22 नोव्हेंबर 2025